जनसंपर्क कक्ष

12 JUL 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'च्या चार केंद्रांना मान्यता

## शिवाजी विद्यापीठ : कडगावच्या आबिटकर महाविद्यालयात केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यासकेंद्रांचा समावेश करण्यात आला. तसेच दोन अभ्यासकेंद्रांना प्रत्येकी एक नवीन अभ्यासक्रम देण्यात आला. यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्राचा समावेश आहे.

या अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता दिल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के. मोरे यांनी दिली. त्यामुळे सध्या अभ्यासकेंद्रांची संख्या ८६ इतकी झाली आहे. कडगाव (ता. भुदरगड) येथील आनंदराव आबिटकर महाविद्यालयात केंद्र सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय जा. बोवलाद (ता. जत) येथील गजानन महाविद्यालय, खानापूर (जि. सांगली) येथील संपतराव माने महाविद्यालय, व महाबळेश्वर येथील गिरीस्थान आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचा समावेश आहे. माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालयाला एम.ए. राज्यशास्त्र तर सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाला एम.एस्सी (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने देण्यात आला.

महासत्ता

# दूरशिक्षण केंद्राच्या नव्या चार अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता

कोल्हापूर ता.१०(प्रतिनिधी) –

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यासकेंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.तसेच दोन अभ्यासकेंद्राना प्रत्येकी एक नविन अभ्यासक्रम देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्राचा समावेश आहे.

या अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली. त्यामुळे सध्या अभ्यासकेंद्राची संख्या ८६ इतकी झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात एक श्री.आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगाव (ता.भुदरगड), सांगली जिल्ह्यात दोन श्री.गजानन कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जा.बोबलाद (ता.जत) आणि श्री. संपतराव माने महाविद्यालय, खानापूर तसेच सातारा जिल्ह्यातील एक गिरीस्थान आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज महाबळेश्वर यांचा समावेश आहे. तसेच श्रीपतराव चौगुले कला व विज्ञान महाविद्यालय माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) या अभ्यासकेंद्रास एम.ए.राज्यशास्त्र तर सातारा येथिल लालबहादूर शास्त्री महाविद्यालय अभ्यासकेंद्रास एम.एस्सी (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने देण्यात आलेला आहे. नवीन अभ्यासकेंद्रांमध्ये त्या त्या परिसरातील विद्यार्थी, गृहिणी,कामगार यांनी प्रवेशित व्हावे असे आवाहन संचालक प्रा.डॉ.डी.के मोरे यांनी केले आहे.

लोकमत

# २३ अभ्यासक्रमांसाठी १८ जुलैला परीक्षा

शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या होत्या मात्र, यात एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, एम. एस्सी. बॉटनी, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी. जे. एम. जे., एम. ए. इन मास कम्युनिकेशन यांसह २३ अभ्यासक्रमांच्या अनेक जागा रिक्त राहिल्याने यासाठी १८ जुलैला विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात पुन:प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत. यासाठी मंगळवारपासून ऑनलाइन अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, विद्यार्थ्यांना १६ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

---

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ च्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून मंगळवारी एम.ए., बी. फार्मसी, एम.बी.ए. यांसह सात अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

या परीक्षांसाठी २०३५ विद्यार्थी उपस्थित होते. एम. एस्सी. फूड सायन्स सेमिस्टर चार, बी.ए. सेमिस्टर तीन, चार यासह २९ अभ्यासक्रमांचे निकाल मंगळवारी घोषित करण्यात आले.

पुढारी

संक्षिप्त



# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला २०३५ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत मंगळवारी सात अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयातून सुमारे २०३५ विद्यार्थी परीक्षेला बसले. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. मंगळवारी मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठांतर्गत ४१४ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युतरच्या विविध परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी झालेल्या परीक्षेला २०३५ विद्यार्थी उपस्थित होते. सातारा १४, कोल्हापूर ३ अशा एकूण १७ कॉपीच्या प्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. तसेच परीक्षेत गैरप्रकार घडू नये म्हणून विद्यापीठाने भरारी पथकाची नियुक्ती केली आहे आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ४१४ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.